पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८
मा.शहर सुधारणा समिती
कार्यपत्रिका क्रमांक – २१

**सभावृत्तांत**

दिनांक : ०६/०३/२०१३ वेळ : दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०६/०३/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय - सभापती
२) मा. यमुनाताई रमणनाना पवार
३) मा. प्रशांत शितोळे
४) मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
५) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६) मा. सावळे सिमा रविंद्र

याशिवाय मा.गावडे - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.भदाणे - उपसंचालक नगररचना, मा.काची - सह शहर अभियंता, मा.पाटील, मा.ढगे, मा.जाधव - कार्यकारी अभियंता, मा.शिंपी - नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले -**

विषय क्रमांक १) मौजे थेरगांव येथील १२ मी.रुंद रस्ते महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत - मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक २) मौजे किवळे येथील सर्व्हे नं.४० मधील मंजूर विकास योजनेमधील १५ मी. रुंदीचा दक्षिण उत्तर रस्ता तसेच ( एम.४-२०) प्रमाणे शिफटेड रोड रद्य करणेबाबत मा.प्रशांत शितोळे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३) कमर्शियल झोन (सी.२) रद्य करुन सदरील झोन रेसिडेन्शियल झोन करणेबाबत - मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ८१ विषय क्रमांक : १

दिनांक : ०६/०३/२०१३

सुचक : मा. नारायण बहिरवाडे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

मंजूर विकास योजनेतील मौजे थेरगांव हद्यीतील सर्व्हे नं.३३ ते ३६ पै. मधून मोरया मंगल कार्यालयाकडे जाणा-या २४ मी. रुंद रस्त्यापासून थेरगांव स्मशानभूमी पर्यंत १२ मी. रुंद रस्ता व स्मशानभूमी ते थेरगांव गावठान २४ मी. रस्त्यापर्यंत सध्या अस्तित्वातील रस्ता ९ मी. रस्ता रुंद केल्यास नागरिकांची स्मशानभूमीकडे जाण्यासाठी त्या भागातील नागरिकांना रस्त्याची सोय होणार असल्याने सदरचा रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस तसेच मंजूर विकास योजनेतील मौजे थेरगांव हद्दीतील सर्व्हे नं.२५ व ३० मधून जाणारा १२ मीटर रस्ता सर्व्हे नं. २५ मध्ये अस्तित्वातील रस्त्याजवळ वाकडया वळणाचा असल्याने सदरचा रस्ता वाहतूकीच्यादृष्टीने सरळ करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८२ विषय क्रमांक : २

दिनांक : ०६/०३/२०१३

सुचक : मा. प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र.टीपीएस-१८१०/२४५८/प्र.क्र.१६/११/नवि-१३, दिनांक १४/०५/२०१२ अन्वये मौजे किवळे येथील सर्व्हे नं.४० मधील मंजूर विकास योजनेमधील १५ मी. रुंदीचा दक्षिण उत्तर रस्ता तसेच (एम.४-२०) प्रमाणे शिफटेड रोड रद्द करुन सदर रस्त्याने बाधीत क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करण्याची मागणी संबंधीत सर्व जागेच्या मालकांची असल्याने व सदर जागेचे एकच जागामालक असून त्यांचे मागणीनुसार सदर प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६

चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८३ विषय क्रमांक : ३

दिनांक : ०६/०३/२०१३

सुचक : मा. नारायण बहिरवाडे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या भागश: मंजूर विकास योजनेतील मौजे चिखली येथील देहू-आळंदी रस्ता, सोनवणे वस्ती २४ मी. व ३० मी. रस्त्यालगत ग.क्र. १६१२ पै., १६२० पै. या जागेवरील कमर्शियल झोन (सी.२) मंजूर झाली आहे. सदर ठिकाणी नगारिकांनी रहिवाश्यांकरिता घरे बांधली असून कमर्शियल झोन (सी.२) रद्द करुन सदरील झोन रेसिडेन्शियल झोन म्हणून करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**(बो-हाडे शुभांगी संजय)**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ २५० /२०१३
दिनांक : ०६/०३/२०१३

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधीत शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.